महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ◆२१ ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक०६० ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

### अतिवृष्टीचा दुसरा दिवस

## मुंबईसह ठाणे,पालघर,रायगड जिल्ह्यातील जनजीवन विस्कळीत




### अनेक नद्यांना पूर

### पूल पाण्याखाली गेल्याने गावांचा संपर्क तुटला

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जिल्ह्यात मागील 48 तासांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसानं मोठा कहर केला असून, यंदाच्या वर्षातील विक्रमी पावसाची नोंद झाली आहे. सततच्या पावसामुळे ठाणे जिल्ह्यातील अनेक नद्या, ओढ्यांना पूर आला असून, ग्रामीण भागातील अनेक गावांना जोडणारे पूल पुराच्या पाण्याखाली गेले आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झालं आहे.

**प्रमुख मार्ग पाण्याखाली, वाहतूक व्यवस्था पूर्णतः ठप्प** : कल्याण-नगर, भिवंडी-वाडा आणि कल्याण-शीळ हे प्रमुख मार्ग पाण्याखाली गेले असून या मार्गांवर शेकडो वाहनं अडकून पडली आहेत. परिणामी वाहतूक व्यवस्था पूर्णतः ठप्प झाली आहे. मध्य रेल्वे मार्गावर पाणी साचल्यामुळे रेल्वे सेवा देखील पूर्णपणे विस्कळीत झाली असून, हजारो प्रवासी विविध रेल्वे स्थानकांवर अडकून पडले आहेत. यामुळे नागरिकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. सर्वाधिक पाऊस उल्हासनगर आणि अंबरनाथ तालुक्यांमध्ये नोंदवण्यात आला आहे. जिल्हा प्रशासनाकडून आपत्कालीन मदत कार्य सुरू करण्यात आलं असून, नागरिकांनी आवश्यक नसताना घराबाहेर पडू नये, असा इशारा देण्यात आला आहे.

**संसारोपयोगी साहित्याचं मोठं नुकसान** : गेल्या दोन दिवसांपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे ठाणे जिल्ह्यातील सर्वच शहरांतील सखल भागांमध्ये पाणी साचलं असून, शेकडो घरांमध्ये पावसाचं पाणी घुसल्यानं नागरिकांचे मोठे हाल झाले आहेत. भिवंडी, कल्याण, डोंबिवली, मुंब्रा, अंबरनाथ, टिटवाळा, उल्हासनगर, बदलापूर, मुंबई एअरपोर्ट यांसारख्या शहरी भागांसह ग्रामीण भागांतील अनेक सखल परिसर जलमय झाले आहेत. या भागांतील हजारो नागरिकांरी घरं आणि दुकानं पाण्याखाली गेल्यानं संसारोपयोगी वस्तूंचं मोठं नुकसान झालं आहे.

तसेच, अनेक रस्त्यांवर पाणी साचल्यानं वाहनं बंद पडली असून, वाहनचालकांना पाण्यात अडकलेली वाहनं ढकलत बाहेर काढावी लागत आहेत. या परिस्थितीमुळे नागरिकांचं दैनंदिन जीवन पूर्णतः विस्कळीत झालं आहे.

### मध्य-पश्चिम रेल्वे धीम्या गतीने सुरू

### कल्याण-मुरबाड महामार्ग ठप्प | उल्हास,तानसा,भातसा बारवी,काळू नद्यांना महापूर

**बदलापूर आणि मुरबाडला पावसाचा सर्वाधिक फटका** : बदलापूर आणि मुरबाड तालुक्यांना सर्वाधिक पावसाचा फटका बसला आहे. अंबरनाथ तालुक्यातील रायते ते दहागाव मार्गावरील उल्हास नदीवरील पुलावर पाणी आल्यानं वाहतूक ठप्प झाली आहे. मुरबाड तालुक्यातील चिखले गावाला जाणाऱ्या काळू नदीवरील पुलावरून पाणी वाहत असल्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे.

तसेच, मुरबाड तालुक्यातील मुरबाडी नदीवरील पुलावरून पाणी गेल्यानं 50 हून अधिक गावांचा संपर्क तुटला आहे. संततधार पावसामुळे मुरबाड तालुक्यातील दूधनोळी येथील समीर संतोष राऊत (वय 25) या तरुणाचा पाडाळ येथील तलावात बुडून मृत्यू झाला आहे. शहापूरमध्ये एक कच्चं घर कोसळलं आहे. पण सुदैवानं कोणतीही जीवितहानी झाली नाही, अशी माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

**रायते पूल वाहतुकीसाठी बंद** : मंगळवार संध्याकाळपासून कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर असलेला रायते येथील पूल वाहतुकीसाठी बंद करून तेथील वाहतूक टिटवाळामार्गे वळवण्यात आली होती. मात्र, टिटवाळा परिसरातही उल्हास नदीच्या पाण्याची पातळी वाढल्यामुळे, टिटवाळ्याहून गोविली-रायतेकडे जाणारा मार्ग देखील बंद करण्यात आल्याची माहिती कल्याण तालुका तहसीलदारांनी दिली आहे.

नदीच्या पाण्याची पातळीत मोठ्या प्रमाणात वाढल्याने नदीपात्राबाहेर पाणी येऊन सखल भागात पाणी साचलं आहे. या पाण्यामुळे शहाड फाटक येथील रस्ता बंद झाला असून, वाहतूक पूर्णतः ठप्प झाली आहे.

**प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा** : जिल्ह्यात सर्वत्र मुसळधार पावसाचा प्रचंड जोर कायम असून, आपत्ती व्यवस्थापन आणि महसूल विभागाच्या यंत्रणा प्रत्येक ठिकाणी कार्यरत असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

## अक्षय ऊर्जेचा वापर ही काळाची गरज

### - केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : अक्षय ऊर्जेचा वापर ही काळाची गरज आहे, आपल्या घराच्या छतावर सौर ऊर्जा सयंत्रे,तसेच महापालिका क्षेत्रातील नागरिकांनी ऊर्जा कार्यक्षम एल.इ.डी.लाईट, फॅन व 5 स्टार रेटिंग घरगुती विज उपकरणाचा वापर करून ऊर्जा बचत करावी,असे प्रतिपादन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी आज केले. महापालिकेच्या विद्युत विभागामार्फत महापालिका मुख्यालयाच्या प्रांगणात अक्षय ऊर्जा दिनानिमित्त आयोजिलेल्या कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे प्रतिपादन केले. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे विद्युत निरीक्षक भुषण मानकामे, महापालिकेच्या शहर अभियंता अनिता परदेशी, उपआयुक्त संजय जाधव, कांचन गायकवाड, विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत, उप अभियंता भागवत पाटील, जितेंद्र शिंदे , इतर अधिकारी व विद्युत विभागातील कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

भारतात 58% विद्युत निर्मिती कोळशापासून होते. या प्रक्रियेत कार्बन डॉय ऑक्साईड या घातक वायुची निर्मिती होत असल्यामुळे, नेहमी हरित ऊर्जेचा म्हणजे अक्षय ऊर्जेच्या वापरास प्राधान्य दिले पाहिजे , अशी माहिती विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी यावेळी दिली.

या कार्यक्रमात महापालिकेच्या विद्युत विभागामार्फत,"महापालिकेने सौर ऊर्जा क्षेत्रात केलेली भरीव कामगिरी" या पुस्तिकेचे तसेच हस्तपत्रकांचे, जनजागृतीपर फलकाचे अनावरण महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांचे हस्ते करण्यात आले. यावर्षीच्या श्री गणेशोत्सवात सर्व विसर्जन स्थळी या हस्तपत्रकांच्या माध्यमातून अक्षय ऊर्जेबाबत जनजागृती केली जाईल, अशीही माहिती विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी यावेळी दिली. यावेळी विद्युत विभागातील कर्मचाऱ्यांमार्फत अक्षय ऊर्जा, सोलार एनर्जीचा वापर या संदर्भात एका लघु नाटक सादरीकरण करून अक्षय ऊर्जाबाबत उपस्थित महापालिका अधिकारी, कर्मचारी व नागरीक यांना माहिती देण्यात आली.

## समाज कल्याण विभागांतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी अर्ज प्रक्रिया सुरु

### ऑगस्ट २०२५ अखेर ऑनलाईन अर्ज दाखल करण्याचे आवाहन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांच्या वतीने ५% दिव्यांग कल्याण सेस व २०% जिल्हा परिषद सेस अंतर्गत विविध वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात येत असून, जिल्ह्यातील पात्र दिव्यांग व मागासवर्गीय (SC/ST/NT) लाभार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत असून, लाभार्थ्यांनी जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर https://zpthaneschemes.com या लिंकवर ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी उज्वला सपकाळे यांनी केले आहे.

**५% दिव्यांग कल्याण सेस अंतर्गत प्रमुख योजना:**

1. दिव्यांग लाभार्थ्यांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन देणे.
2.दिव्यांग लाभार्थ्यांना तीन चाकी वाहन(स्कुटी) खरेदीसाठी अनुदान देणे
3. दिव्यांग-दिव्यांग व्यक्तिंना विवाहासाठी प्रोत्साहनपर अनुदान देणे.
4.दिव्यांग शेतकऱ्यांना शेतीपुरक व्यवसायासाठी शेळीपालन वराहपालन, मत्स व दुग्धव्यवसाय इत्यादीसाठी अर्थसहाय्य देणे.
5. दिव्यांग पालकाच्या मुलीसाठी माझी लेक योजनेअंतर्गत रु 50000/-मुदतठेव रक्कम ठेवणे.
6.उच्च व तांत्रिक शिक्षणासाठी अपंग विद्यार्थ्यांना विशेष शिष्यवृत्ती देणे.

**२०% जिल्हा परिषद सेस अंतर्गत प्रमुख योजना:**

1. इ.5 वी ते 9 वी च्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकली पुरविणे.
2. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे (एकवेळ)
3. मागासवर्गीय इयत्ता 11वी व 12 वी तील विद्यार्थ्यांना MH-CET ENINREEING/JEE// NEET च्या प्रशिक्षणवर्गाची खाजगी संस्थेला दिलेल्या फीची प्रतिपूर्ती करणे.
4. मागासवर्गीय लाभार्थ्यांना व्यवसायासाठी आर्थिक सहाय्य देणे व वैयक्तिक लाभार्थी/ महिला बचत गट यांना लघुउद्योगासाठी आर्थिक सहाय्य देणे.
5. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना MSCIT संगणक / टंकलेखन (मराठी/इंग्रजी) प्रशिक्षण पुर्ण केल्यावर फी प्रतीपुर्ती करणे.
6. मागासवर्गीय लाभार्थ्यांना डिस्को जॅकी (D.J.) साहित्य पुरविणे.

**अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे:**

* आधारकार्ड,* बँक खाते,* उत्पन्नाचा दाखला,
* शैक्षणिक / प्रशिक्षण प्रमाणपत्रे,
* दिव्यांगत्व प्रमाणपत्र (दिव्यांग अर्जदारांसाठी),
* जात प्रमाणपत्र (मागासवर्गीय अर्जदारांसाठी)
* स्थानिक स्वराज्य संस्थेचे दाखले

अर्जाची सविस्तर यादी व तपशील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**अर्ज पडताळणी कालावधी:**

* तालुका स्तर तपासणी: १ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर २०२५
* जिल्हा स्तर तपासणी: १६ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२५

अर्ज प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक व सुलभ ठेवण्यात आली आहे. दारिद्र्यरेषेखालील व वार्षिक उत्पन्न रु. १ लाखपर्यंत असणाऱ्या दिव्यांग व मागासवर्गीय लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

जिल्हा परिषदेच्या वतीने सर्व पात्र लाभार्थ्यांनी ही सुवर्णसंधी साधून ३१ ऑगस्ट २०२५ रोजी पर्यंत अर्ज दाखल करून योजनांचा लाभ घ्यावा. तसेच ग्रामसेवक, सरपंच, शाळा व महाविद्यालयांनी पात्र लाभार्थ्यांपर्यंत माहिती पोहोचवून योजनांमध्ये सहभाग वाढवावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

## मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांची राज्य आपत्कालीन केंद्राला भेट

### अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा घेतला आढावा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्यात अनेक ठिकाणी सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी मंत्रालयातील राज्य आपत्कालीन कार्य केंद्राला भेट देऊन अतिवृष्टीमुळे राज्यात उद्भवलेल्या परिस्थितीचा नुकताच आढावा घेतला.

मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी या भेटी वेळी राज्यात अतिवृष्टीमुळे निर्माण परिस्थितीची माहिती घेऊन पावसामुळे उद्भवलेली पूरस्थिती, वाहतुकीतील अडथळे, पिकांचे नुकसान आणि आपत्कालीन सेवांच्या कार्यवाहीची माहिती घेतली. आवश्यक तेथे राज्य आपत्ती प्रतिसादात दल व राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची पथके पाठवावीत अशा सूचना त्यांनी दिल्या. अतिवृष्टीमुळे नदीकाठच्या लोकांचे स्थलांतर सुरक्षितस्थळी करावे. या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तात्काळ उपाययोजना कराव्यात. यासाठी प्रशासनाने वेगाने कारवाई करावी, आशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

पावसामुळे बाधित होणाऱ्या शेत पिकांचे तातडीने पंचनामे करावेत, अतिवृष्टी काळात विशेषतः नद्या, धरणे व पाणीपातळीवर सतत लक्ष ठेवून आवश्यकतेनुसार प्रतिबंधात्मक उपाययोजना करून हवामान विभागाशी सतत संपर्क साधून येणाऱ्या पावसाचा अंदाज जनतेपर्यंत वेळीच पोहचवण्यात याव्यात असेही मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले.

राज्य आपत्कालीन कार्य केंद्राचे संचालक डॉ. भालचंद्र चव्हाण यांनी अतिवृष्टीमुळे निर्माण झालेली परिस्थिती, मदत व बचाव कार्य या विषयी माहिती दिली.

### भिवंडीतील धुळखाडी येथे

## गोदामात अडकून पडलेल्या ९ कामगारांची सुखरूप सुटका



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : मुसळधार पावसाने सर्वत्र दाणादाण उडवली त्यामुळे अनेकांचे मोठे नुकसान झाले आहे. पावसामुळे भिवंडी व तालुक्यातील नदी पात्रातील पाणी पातळी वाढली आहे.त्यामुळे उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी सतर्कतेचा इशारा दिला आहे. असे असतानाच उल्हास नदी मध्ये पाण्याची पातळी वाढल्याने त्याचे बॅक वॉटर भिवंडी तालुक्यातील लोनाड ग्रामपंचायत हद्दीतील चौधरपाडा येथील धूळखाडीतील पाणी वाढल्याने येथील सोनाळे बापगाव हा रस्ता वाहतुकीसाठी बंद झाला आहे. यावेळी त्या रस्त्या जवळ असलेल्या श्री. डिजिटल स्केल व निखिल जैन यांच्या मालकीच्या गोदामात ९ कामगार काल मंगळवार पासून अडकून पडले होते.आज सकाळी पुन्हा पाणी वाढल्याने या कामगारांनी मालकास या बाबत माहिती देण्यात आली. स्थानिक ग्रामपंचायत सरपंच वनिता जाधव व ग्रामविस्तार अधिकारी व्यंकटेश धोंडगे यांना ही माहिती समजताच त्यांनी तहसीलदार अभिजित खोले यांना या बाबत माहिती कळविली तहसीलदार अभिजित खोले यांनी तातडीने गंभीर दखल घेऊन मंडळ अधिकारी संतोष आगिवले व ग्राम महसूल अधिकारी चित्रा विशे यांच्या पथकास सुचना देत भिवंडी अग्निशामक दलाच्या आपत्तीव्यवस्थापन पथकासह घटनास्थळी जाण्याचे निर्देश दिले त्यामुळे सदर पथकाने सर्व साहित्य व एका होडीच्या मदतीने गोदामात अडकून पडलेल्या कामगारांची एका तासात सुखरूप सुटका केली आहे.त्यामुळे सर्व कामगारांनी त्यांचे आभार मानले आहेत.






# गीतासार

### अध्याय १८
### मोक्षसंन्यासयोगः

यदहङ्कारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे । मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ॥ १८-५९ ॥

तू अहंकार धरून मी युद्ध करणार नाही, असे मानतोस, तो तुझा निश्चय व्यर्थ आहे, कारण तुझा स्वभाव तुला जबरदस्तीने युद्ध करावयास लावील. ॥ १८-५९ ॥

स्वभावजेन कौन्तेय निबद्धः स्वेन कर्मणा । कर्तुं नेच्छसि यन्मोहात्करिष्यस्यवशोऽपि तत् ॥ १८-६० ॥

हे कौंतेया (अर्थात कुंतीपुत्र अर्जुना), जे कर्म तू मोहामुळे करू इच्छित नाहीस, तेही आपल्या पूर्वकृत स्वाभाविक कर्माने बद्ध असल्यामुळे पराधीन होऊन करशील. ॥ १८-६० ॥

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति । भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया ॥ १८-६१ ॥

हे अर्जुना, अंतर्यामी परमेश्वर आपल्या मायेने शरीररूपी यंत्रावर आरूढ झालेल्या सर्व प्राण्यांना त्यांच्या कर्मांनुसार फिरवीत सर्व प्राण्यांच्या हृदयात राहिला आहे. ॥ १८-६१ ॥

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत । तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥ १८-६२ ॥

हे भारता (अर्थात भरतवंशी अर्जुना), तू सर्व प्रकारे त्या परमेश्वरालाच शरण जा. त्या परमात्म्याच्या कृपेनेच तुला परमशांती आणि सनातन परमधाम मिळेल. ॥ १८-६२ ॥

# बोरघाट महामार्ग अवजड वाहतुकीसाठी बंदी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता /रायगड : मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग (क्रमांक 48) बोरघाट या महामार्गावर जड-अवजड वाहतुकीमुळे वारंवार होणारे अपघात रोखण्यासाठी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून उपाययोजना म्हणून या अधिसूचनेच्या दिनांकापासून ते पुढील आदेश होईपर्यंत मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग (क्रमांक 48) बोरघाट या महामार्गावर सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांच्या वाहतूकीसाठी पूर्णत: बंद करण्याची अधिसूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केली आहे. सदर कालावधीकरीता रायगड जिल्हा हद्दीमधील वाहतूक सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांच्या वाहतूकीकरीता बंद करण्याबाबत पोलीस अधीक्षक रायगड यांच्या पत्राच्या अनुषंगाने मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग (क्रमांक 48) बोरघाट हा तीव्र चढउताराचा वाळणाचा रस्ता असल्याने या महामार्गावरील यापुर्वी घडलेल्या अपघातांच्या घटनांमुळे तसेच सद्यस्थितीत वारंवार होत असलेल्या अपघातांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून उपाययोजना व जनतेच्या सुरक्षिततेसाठी या महामार्गावरुन जड-अवजड वाहतूक पूर्णपणे बंद करणे आवश्यक असल्याबाबत जिल्हाधिकारी यांची खात्री झाली आहे.

# टिटवाळा इंदिरानगर परिसरात चाळींमध्ये शिरले पाणी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिका अ प्रभाग क्षेत्रातील टिटवाळा इंदिरानगर स्मशानभुमी रस्ता विभागात अनेक चाळी मधील लोकांच्या घरात पावसामुळे गटार लाईन नसल्याने सांडपाणी शिरले आहे. याठिकाणी मोठ्या प्रमाणात लोकवस्ती वाढली असून सर्व गोरगरीब नागरिक याठिकाणी राहण्यास आहे. येथे गटार लाईनच्या अभावी नागरिकांच्या घरी पाणी शिरत आहे.

येथील संघर्ष रहिवासी संघटनेच्या वतीने याबाबत केडीएमसी प्रशासनाला तक्रार करून देखील दखल घेण्यात येत नाही. माता रमाबाई चाळ ते सिद्दिकी होम्स चाळ पर्यंत पायवाट लवकर बनविण्यासाठी देखील या संघटनेचा पाठपुरावा सुरू आहे. या वस्तीमध्ये वृद्ध महिला पुरुष, गर्भवती महिलांना शाळेतील लहान मोठ्या मुलांना, रुग्णवाहिका व अग्निशमन दलाची वाहने येण्याजाण्यासाठी रस्ता नाही. म्हणून याठिकाणी लवकरात लवकर पायवाट रस्ता बनवावा. तसेच या रस्त्याच्या वाटेवर गवत झाडी झुडपे मोठ्या प्रमाणात वाढली असून यामुळे साप, सरडे, विंचू यासारख्या घातक प्राण्यांपासून येथील रहिवाश्यांना त्रास होत आहे. त्यामुळे या समस्येकडे देखील लक्ष देण्याची मागणी संघर्ष रहिवासी संघटनेचे अध्यक्ष गणेश भाटे यांनी केडीएमसीच्या अ प्रभागक्षेत्र सहाय्यक आयुक्तांकडे पत्राद्वारे केली आहे.

# भिवंडी महापालिका कर्मचारी संघर्ष कृती समितीचा आयुक्त प्रशासनाला आंदोलनाचा इशारा



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी महानगर पालिका आयुक्त प्रशासनाला युनियन मार्फत निवेदन देऊन सुद्धा दुर्लक्ष केले जात असल्यामुळे पालिका कर्मचारी पुन्हा एकदा युनियन चे माध्यमातून आंदोलन करण्याच्या मार्गावर आहेत. कर्मचाऱ्यांना सहाव्या आणि सातव्या वेतन आयोगाची थकबाकी दिली गेली नाही तर सोमवार, २५ ऑगस्ट रोजी महानगरपालिका मुख्यालयाच्या गेटवर एक दिवसाचे "इशारा आंदोलन" करण्यात येईल, असा इशारा महानगरपालिका कामगार कर्मचारी संघर्ष कृती समितीने दिला असल्याची माहिती समीतीचे महेंद्र कुंभारे, श्रीपत तांबे, भानुदास भसाळे यांनी लेखी निवेदन पत्राद्वारे प्रशासनाला दिला आहे.

भिवंडी महानगर पालिका प्रशासनावर कर्मचारी कृती समितीने निवेदनात म्हटले आहे की प्रशासन आर्थिक संकटाचे कारण देत वेतन आयोगाची थकबाकी रोखत आहे. मात्र दुसरीकडे कंत्राटदारांची बिले मोठ्या मंजूर करीत आहेत तसेच पालिका प्रशासनत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचाराच्या तक्रारी सतत समोर येत आहेत. आर्थिक टंचाईचे कारण देत जेव्हा त्यांचे हक्क रोखले जातात, तेव्हा कंत्राटदारांना निधी कसा उपलब्ध होतो ? असा सवाल कर्मचारी संघर्ष कृती समितीने उपस्थित केला आहे. हे आंदोलन ही फक्त सुरुवात आहे. जर प्रशासनाने त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले तर भविष्यात बेमुदत उपोषण तसेच मोठे आंदोलन केले जाईल. कृती समितीने सर्व कर्मचाऱ्यांना आपले काम संपवून मोठ्या संख्येने आंदोलनात सामील होण्याचे आणि एकता दाखवण्याचे आवाहन केले आहे.कामगार नेत्यांचे म्हणणे आहे की कर्मचाऱ्यांच्या "न्याय हक्कासाठी"ही लढाई आहे आणि ती कोणत्याही परिस्थितीत जिंकली पाहिजे. या आंदोलनाचा थेट परिणाम प्रशासन आणि प्रशासकीय कामावर होऊ शकतो, कारण वेतन आयोगाचा मुद्दा बऱ्याच काळापासून प्रलंबित आहे आणि हजारो कर्मचाऱ्यांचे भविष्य त्याच्याशी जोडलेले आहे. या आंदोलनात प्रामुख्याने म्युनिसिपल मजदूर युनियन,भारतीय कामगार कर्मचारी महासंघ,अखिल महाराष्ट्र जनरल कामगार युनियन, रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेड आणि शासकीय वाहन चालक (भिवंडी युनिट) या युनियन चा समावेश राहणार असल्याचे निवेदन कर्मचारी संघर्ष कृती समितीने नमुद केले आहे.

# नवीन आधार केंद्रासाठी अर्ज करण्याचे आवाहन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : रायगड जिल्ह्यातील नागरीकांचे नवीन आधार काढणे व आधार कार्ड वरील माहिती अद्ययावत करण्याकरीता जिल्ह्यामध्ये सद्यस्थितीत एकूण 74 आधार संच कार्यान्वित आहेत. जिल्ह्याची लोकसंख्या व आधार केंद्रांची मागणी पाहता नवीन आधार केंद्रांची स्थापना करण्याची आवश्यकता आहे. जिल्ह्यामध्ये नव्याने 99 आधार केंद्रांची स्थापना करण्याकरीता 15 तालुक्यांमध्ये नवीन आधार केंद्र सुरु करण्यासाठी इच्छुक पात्र असलेल्या आपले सरकार सेवा केंद्र चालकांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या https://raigad.gov.in या संकेतस्थळावर अर्जाचा नमूना, पात्रतेचे निकष ही माहिती उपलब्ध आहे. इच्छुकांनी विहीत कागदपत्रासह आपले अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयातील नोंदणी शाखा मध्ये समक्ष दि. 21 ऑगस्ट ते दि. 08 सप्टेंबर या कालावधीमध्ये सायंकाळी 06.15 वाजेपर्यंत जमा करावेत.

प्राप्त आधार सेवा केंद्रांच्या मागणी अर्जाची छानणी दि.09 ते दि.16 सप्टेंबर दरम्यान करण्यात येणार आहे. प्राप्त आधार केंद्रांच्या मागणी अर्जावर जिल्हास्तरीय कार्यवाही दि.17 ते दि.25 सप्टेंबर दरम्यान करण्यात येईल.

रायगड जिल्ह्यातील रिक्त केंद्रांची महसूल मंडळ निहाय एकूण माहिती खालीलप्रमाणे- अलिबाग तालुका- किहीम, रामराज, सारळ, चरी, नागाव, कामार्ले, पोयनाड महसूल मंडळ:- एकूण-8, कर्जत तालुका- कशेळे, कडाव, कळंब, किरवली, पाथरज- महसूल मंडळ एकूण-8, खालापूर तालुका वावोशी, चौक, खालापूर, वासांबे- महसूल मंडळ एकूण-6, महाड तालुका महाड बिरवाडी, तुडौल, नाते, करंजाडी, खरवली, गोंडाळे, मांघरुण, शिरगांव महसूल मंडळ एकूण-16, माणगांव तालुका -,माणगांव, गोरेगांव, निजामपूर, लोणेरे, इंदापूर, मोर्चा, विळे महसूल मंडळ एकूण-10, म्हसळा तालुका म्हसळा खामगांव, मंदडी-महसूल मंडळ एकूण-5, तालुका मुरुड-बोर्ली, मुरुड, नांदगांव - महसूल मंडळ एकूण-3, तालुका पनवेल शहरी-ओवळे, पळस्पे, तळोजा, महसूल मंडळ एकूण-3, पनवेल ग्रामीण- पोयंजे, मोर्बे, कर्नाळा, नेरे महसूल मंडळ एकूण-6, पेण तालुकाहमरापूर, वाशी, कासु, कामार्ली- महसूल मंडळ एकूण-७ पोलादपूर-पोलादपूर कोंढवी, वाकण- महसूल मंडळ एकूण-5 रोहा-रोहा, कोलाड, चणेरा, घोसाळे, निडी त.अष्टमी, आंबेवाडी- महसूल मंडळ एकूण-8, श्रीवर्धन-श्रीवर्धन, वाळवटी महसूल मंडळ एकूण-3, सुधागड- पाली, नांदगांव, जांभूळपाडा, महसूल मंडळ एकूण-7, तळा-मांदाड, सोनसडे- महसूल मंडळ एकूण-4 असे एकूण 99 आधार केंद्र आहेत. नवीन आधार केंद्राचा अर्ज करतांना तांत्रिक अडचणी असल्यास जिल्हा माहिती व तंत्रज्ञान कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हास्तरीय आधार नियंत्रण समिती रायगड यांनी केले आहे.

# महाराष्ट्र सदनात सद्भावना दिन साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्ली : दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र सदनात आज सद्भावना दिन साजरा करण्यात आला. कोपर्निकस मार्गावरील महाराष्ट्र सदनातील सभागृहात झालेल्या कार्यक्रमात निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना सद्भावना दिनाची शपथ दिली.

यावेळी आर. विमला यांनी दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार यांच्यासह महाराष्ट्र सदन व महाराष्ट्र परिचय केंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही राजीव गांधी यांना आदरांजली अर्पण केली.

# अखंड भारत व्यासपीठ उपाध्यक्षपदी रविंद्र कराडकर यांची नियुक्ती



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील पडघा येथील रहिवासी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक आणि दीर्घकाळ सामाजिक कार्यकर्ते असलेले रवींद्र अंनत कराडकर यांची संघ परिवारातील अखंड भारत व्यासपीठ या संघटनेच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वरिष्ठ क्षेत्रीय प्रचारक सुमंत आमसेकर, विश्व हिंदू परिषद,अयोध्या राम मंदिर पुनर्निर्माणाचे क्षेत्रीय संघटन मंत्री आणि अखंड भारत व्यासपीठाचे अध्यक्ष संजय ढवळीकर यांच्या उपस्थितीत ठाणे येथील बाळासाहेब ठाकरे संकुल येथे एका कार्यक्रमात कराडकर यांची नुकतीच निवड करण्यात आली. सर्वानीं त्यांचे वर्णन "एक समर्पित आणि दृढ कार्यकर्ता ज्यांची सेवा दशकांपासून अटल आहे" असे केले.५० वर्षांहून अधिक काळ ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जोडलेले आहेत, त्यांनी ग्रामीण भागात संघाच्या कार्यासोबतच, ते नंतर नोकरीसाठी ठाण्यात गेले आणि सामाजिक, सांस्कृतिक आणि संघटनात्मक कार्यात त्यांनी स्वतःला वाहून घेतले. पडघा येथील १२३ वर्षे जुन्या श्री दत्त मंदिराचे मुख्य विश्वस्त, पडघा ग्रामपंचायतीचे पाच वर्षे सदस्य, ठाण्यातील सावरकर सेवा संस्थेचे उपाध्यक्ष आणि २५ वर्षांहून अधिक काळ आदिवासी विकास परिषद आणि ठाण्यातील कौपिनेश्वर सांस्कृतिक न्यास नववर्ष यात्रेत सक्रिय सहभाग, तसेच ठाणे जिल्हा पालक आणि हिंदुस्तान प्रकाशन संस्थेचे समिती सदस्य म्हणून काम करत आहेत.असा त्यांचा जिवन प्रवास असुन यावेळी समारंभात बोलताना ढवळीकर म्हणाले "रवींद्र कराडकर" हे निस्वार्थ सेवा, सचोटी आणि अथक समर्पणाच्या आदर्शांचे प्रतिनिधित्व करतात. अखंड भारत व्यासपीठाचे उपाध्यक्ष म्हणून त्यांची नियुक्ती ही त्यांच्या आयुष्यभराच्या योगदानाची पोचपावती आहे. ७२ व्या वर्षी, कराडकर पडघे आणि ठाणे येथे सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि धार्मिक उपक्रमांमध्ये सक्रिय आहेत, अनेकदा त्यांच्या खांद्यावर कापडी पिशवी घेऊन ते पायी प्रवास करतात जे त्यांच्या नम्र आणि सेवा-केंद्रित जीवनशैलीचे प्रतीक आहे.

# कपर्दिकेश्वर यात्रेत भाविकांची गर्दी

- आखाड्यात कुस्तीचा थरार
- ओतूर भूषण पुरस्कार शिवाजी डुंबरे यांना कपर्दिकेश्वर यात्रेत गौरव सोहळा





दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ओतूर : जुन्नर तालुक्यातील भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेले श्री क्षेत्र ओतूर येथे सोमवार दि. २५ ऑगस्ट रोजी चौथ्या श्रावणी सोमवार निमित्त श्री कपर्दिकेश्वर शिवलिंगावर तयार करण्यात आलेल्या कोरड्या तांदळाच्या चार पिंडीचे दर्शन घेण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या लाखो भाविकांनी दर्शन घेतले असल्याचे देवधर्म संस्थेचे अध्यक्ष अनिल तांबे, सचिव महेंद्र (गांधी)पानसरे यांनी सागितले.मंदिर सकाळी सहा वाजता भाविकांच्या दर्शनासाठी खुले करण्यात आले होते. श्री कपर्दिकेश्वर शिवलिंगावर अभिषेक व महाआरती श्री व सौ. इंदिरा विकास डावरे अस्वार,बबन बाबुराव भोर, शिवाजी शंकर पा डुंबरे, पवन हिंदुराज गाडे, डॉ. गणेश दामा,विशाल गुलाब तांबे, कुमुदिनी रविंद्र चव्हाण, वैशाली नायकोडी, सीमा अनिल तांबे यांच्या शुभहस्ते करण्यात आली यावेळी रघुनाथ तांबे,प्रकाश डुंबरे,राजेंद्र डुंबरे, शांताराम पानसरे, माऊली पानसरे, ज्ञानेश्वर पानसरे, रोहिदास घुले, गोपाळ घुले, शांताराम शिंगोटे,धर्मनाथ पानसरे, सखाराम डुंबरे उपस्थित होते.

या निमित्ताने भाविकांसाठी प्रसादाचे वाटप श्री कपर्दिकेश्वर स्विमिंग वॉकिंग ग्रुप,लक्ष्मी ज्वेलर्स (सुळे ब्रदर्स) रेणुका ज्वेलर्स (गडदरे ब्रदर्स) श्रेयस पा. डुंबरे व मित्र परिवाराच्या वतीने करण्यात आले.. यात्रेनिमित्त दुपारी कुस्ती स्टेडियम मध्ये पारंपारिकलहान मोठ्या दोनशे पेक्षा जास्त कुस्त्या झाल्या व निमंत्रित कुस्त्यांचा जंगी आखाडा झाला १ लाख ५१ हजार रुपयांच्या दोन कुस्त्या, ७५ हजार रुपयांच्या दोन कुस्त्या व २५ हजार रुपयांची एक कुस्ती अशा मोठ्या कुस्त्या झाल्या याला सौजन्य नंदलाल लॉन्सचे अशोक डुंबरे, गजानन महाराज शिक्षण संस्थेचे सचिव वैभव तांबे, बालाजी उद्योग समूहाचे जयवंत डुंबरे, मुंबईचे उद्योजक रामचंद्र ढोबळे, माजी सरपंच सचिन घोलप, उपसरपंच प्रशांत डुंबरे, कॉन्ट्रॅक्टर शरद घोलप,दत्तात्रय गिते यांनी दिले. शेवटच्या दोन कुस्त्यासाठी डॉ. युवराज ढमाले यांनी २ चांदीच्या गदा दिल्या.

आखाड्यात उल्हास गाढवे, अविनाश ताजणे, प्रकाश डुंबरे,शिवाजी अस्वार यांनी कुस्त्या जमविण्याचे तर धनंजय डुंबरे, छबूराव थोरात, विकास डुंबरे,जालिंदर ढमाले यांनी पंच म्हणून काम पाहिले. हंगेश्वर धावगुडे पाटील यांनी निवेदन केले तर काळे परिवाराकडून आखाडा व्यवस्थापन केले कुस्त्या पाहण्याचा आनंद कुस्ती शौकिनांनी घेतला.

यावेळी ओतूर भूषण पुरस्कार शिवाजी शंकर पा. डुंबरे यांना विघ्नहर कारखान्याचे चेअरमन सत्यशील शेरकर, गजानन महाराज संस्थेचे अध्यक्ष विशाल तांबे, अनिल तांबे, धनंजय डुंबरे,बाळासाहेब घुले, छाया तांबे, मोहित ढमाले,विशाल तांबे,प्रशांत डुंबरे, जयवंत डुंबरे,रघुनाथ तांबे यांच्या हस्ते देण्यात आला.

यावेळी बाजार समितीचे संचालक माऊली खंडागळे,संतोष चव्हाण,बाबू पाटे, विकास राऊत, वैभव नलावडे,प्रेमानंद अस्वार, जालंदर पानसरे,आत्माराम गाढवे, सचिन आंबेडकर, प्रसाद डुंबरे,पांडुरंग ढोबळे, सीताराम डुंबरे,शरद फापाळे, झांबर जाधव, शशिकांत डुंबरे, मनीष वोरा, राजेंद्र भोर, सुनील खामकर,सिद्धेश डुंबरे,अनुराग फापाळे,गौरव डुंबरे,आशिष गोंदके आदी. ग्रामस्थ उपस्थित होते.

दर्शन बारी व्यवस्थापन अक्षय तांबे,अमोल तांबे, राहुल डुंबरे, सोनल डुंबरे, मनोज डुबरे, मयुर मालकर,अक्षय तांबे,मारुती गाढवे, प्रकाश तांबे,दिनेश कर्डिले, योगेश डुंबरे, स्वप्निल डुंबरे, गौरव डुंबरे व देणगी कक्ष सतीश तांबे, राजेंद्र हांडे, संजय डुंबरे, व ग्रामविकास मंडळ ओतूर यांनी पाहिले. यात्रेत उंचच उंच आकाशी पाळणे सर्वांचे लक्ष वेधून घेत होते, खेळणी, भेळ, मिठाई, बेल, हार, फुले, श्रीफळ यांची दुकाने सजली होती. भाविकांच्या आरोग्य सेवेसाठी ओतूर प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रीहरी सरोकते यांच्या मार्गदर्शना आरोग्य पथक दिवसभर कार्यरत होते. ओतूरचे सहायक पोलिस निरीक्षक लहू थाटे यांच्या मार्गदर्शनात पोलिस कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त तैनात होता.

## रेसिपी
# पोह्याचा जाळीदार डोसा



**साहित्य**

पोहे - 2 ते 3 वाट्या
दही - 1 वाटी
बेकिंग सोडा - 1 चमचा
रवा - 1/2 वाटी
पाणी
मीठ

**कृती**

एका वाटीत पोहे घेऊन त्यात रवा आणि दही एकत्र करून घ्यावे.
यात आवश्यकतेनुसार मीठ घालून मिश्रण बारीक करून घ्यावे.
जास्त पातळ आणि जास्त घट्ट मिश्रण होणार नाही याची काळजी घ्यावी.
यानंतर बेकिंग सोडा घालून मिक्स करा.
तव्यावर पेल्याने जाळीदार डोसे घाला.
अशा पद्धतीने तयार झाले आहेत, पोह्याचे जाळीदार डोसे.
तव्यावर डोशाचे मिश्रण टाकण्याआधी तेल तव्याला लावायला विसरू नये, जेणेकरून तव्याला डोसे चिकटणार नाहीत.

# आजचे राशि भविष्य



**मेष**
तुम्हाला जे काही लोकांना पटवून द्यायचे आहे, ते तुम्ही सहजतेने मान्य करू शकता. तुमचा अधिकार गाजवण्याच्या तुमच्या प्रवृत्तीवर नियंत्रण ठेवा.

**वृषभ**
आज येणाऱ्या सर्व आव्हानांचा धैर्याने सामना केला तर तुम्ही यशस्वी व्हाल.आज अचानक तुमच्या व्यवसायात जास्त फायदा होईल.

**मिथुन**
तुम्ही संध्याकाळचा वेळ कुटुंबासोबत घालवाल. क जे व्यवसाय करतात त्यांना आज आर्थिक लाभ होण्याची अपेक्षा आहे. बोलण्यापूर्वी विचार करा.

**कर्क**
आज तुम्ही एखाद्या जुन्या मित्राला त्याच्या घरी भेटायला जाऊ शकता. विद्यार्थ्यांना यश मिळण्याची शक्यता आहे.आज तुमचे आरोग्य उत्तम राहील.

**सिंह**
तुमच्या कामावर परिणाम होऊ शकतो. या राशीच्या लोकांना आज जवळच्या व्यक्तीकडून चांगली बातमी मिळू शकते.कोणताही निर्णय काळजीपूर्वक घ्या.

**कन्या**
नोकरीसाठी चांगली बातमी मिळू शकते. तुम्हाला एखाद्या कंपनीत मुलाखतीसाठी बोलावले जाऊ शकते. लेखकांसाठी दिवस चांगला असू शकतो.

**तूळ**
जे बेरोजगार आहेत त्यांना रोजगार मिळण्याची शक्यता आहे.वैवाहिक जीवनात आनंद राहील. जे काम पूर्ण करायचे आहे ते सहज पूर्ण होईल.

**वृश्चिक**
तुमच्या प्रियजनांकडून भेटवस्तू मिळेल. जे काम तुम्ही अनेक दिवस पूर्ण करण्याचा विचार करत आहात ते आज काही मदतीमुळे पूर्ण होईल.

**धनु**
प्रेमी युगुलांसाठी दिवस चांगला जाणार आहे. तुमच्या सर्जनशील कार्यात प्रसिद्ध व्हाल आणि प्रसिद्धीही मिळेल. पैशाच्या बाबतीत फायदेशीर ठरतील.

**मकर**
कारकीर्द आता पूर्णपणे नवीन रूप घेईल. आज तुम्ही तुमच्या कुटुंबासोबत रिअल इस्टेट खरेदी करण्याची योजना करू शकता.

**कुंभ**
एखाद्या नातेवाईकाशी वाद झाला असेल तर संबंध सुधारण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. आज तुमचे विरोधक तुमच्यापासून दूर राहतील.

**मीन**
कोणाच्याही कामावर मत देणे टाळा आणि इतरांशी बोलताना योग्य भाषेचा वापर करा.सहलीला जाताना आपल्या आवश्यक वस्तू घेऊन जायला विसरू नका.






# भिवंडी महानगरपालिकेत सद्भावना दिन साजरा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



शासनाच्या निर्देशानुसार माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांचा २० ऑगस्ट हा जयंती दिवस दरवर्षी सद्भावना दिवस म्हणून देशभरांत साजरा केला जातो. शासन परिपत्रकानुसार व मा. प्रशासक तथा आयुक्त श्री अनमोल सागर (भा.प्र.से) यांच्या निर्देशानुसार स्व. राजीव गांधी यांच्या प्रतीमेस मा. अतिरीक्त आयुक्त श्री. विठ्ठल डाके यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर अधिकारी कर्मचा-यांच्या उपस्थितीत सद्भावना दिनाची शपथ घेण्यात आली.

राज्यातील विविध प्रदेशातील अनेक धर्माच्या व अनेक भाषा बोलणा-या लोकांमध्ये एकमेकांविषयी ऐक्याची भावना, सौदार्ह भाव वृध्दींगत करणे व हिंसाचार टाळणे ही या मागची प्रमुख उदिष्टचे असल्याने भिवंडी महानगरपालिकेच्या नविन प्रशासकिय इमारतीमधील तळमजल्यावर शपथ घेऊन साजरा करण्यांत आला. या प्रसंगी मा. शहर अभियंता श्री. जमिल पटेल, सहा. आयुक्त (प्रशासन) श्री. अजित महाडीक, करमुल्यांकन अधिकारी, श्री. सुधीर गुरव, मुख्य उद्यान अधिक्षक श्री निलेश संख्ये, क्रीडा अधिकारी श्री. मिलींद पळसुले, मुख्य आरोग्य निरीक्षक श्री हरीष भंडारी व अधिकारी/कर्मचारी मोठ्या संख्यने उपस्थित होते. अशी माहिती पालिकेचे माहिती व जनसंपर्क अधिकारी श्रीकांत परदेशी यांनी दैनिक ठाणे जीवनदीपला दिली



# उल्हासनगर पालिका आयुक्तांकडून अतिवृष्टीचा आढावा

## पालिका क्षेत्रातील नागरिकांशी साधला संवाद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगरच्या महापालिका आयुक्त तथा प्रशासक मनीषा आव्हाळे यांनी अतिवृष्टीचा प्रत्यक्ष आढावा घेतला. सदर वेळी राजीव गांधी नगर, करोतिया नगर, महात्मा फुले नगर, शांतीनगर, मीनाताई ठाकरे नगर, वेदांत कॉलेज व भारत नगर या ठिकाणी पहाणी करण्यात आली व आवश्यक ती कारवाई करण्याबाबत सूचना देण्यात आल्या; अशी माहिती जनसंपर्क अधिकारी अजय साबळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली

# जोशीपाडा साईकृपा चाळीतील नागरिकांच्या घरात साचले पाणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : कल्याण पश्चिमेतील आधारवाडी परिसरातील जोशी पाडा साईकृपा चाळीतील नागरिकांच्या घरात सतत पडणाऱ्या पावसाने पाणी साचले आहे. याठिकाणी दरवर्षी पावसामुळे पाणी भरत आहे. येथे असलेल्या चेम्बरचे पाणी घरात येत आहे. तीन दिवसांपासून पडत असलेल्या पावसाचे पाणी तीन दिवस येथील नागरिकांच्या घरात साचले आहे. याबाबत केडीएमसीलं तक्रार करून देखील केडीएमसी याकडे लक्ष देत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

घरात पाणी साचले असल्याने या नागरिकांना जेवण बनवणे, तसेच प्राथमिक विधी करणे देखील अवघड झाले आहे. लहानलहान मुलांना देखील या साचलेल्या पाण्यात राहावे लागत असून या नागरिकांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. या चाळीच्या बाजूलाच असलेल्या एका विकासकाने चाळीतील पाणी बाहेर जाण्याचा मार्ग बंद केल्याने या नागरिकांच्या घरात पाणी साचत असून केडीएमसी यामध्ये लक्ष देऊन नागरिकांची त्रासातून मुक्तता करण्याची मागणी मनसेचे शाखा अध्यक्ष दिपेश फुलवाडे यांनी केली आहे.

यावेळी घटनास्थळी स्थानिक मनसे शाखा अध्यक्ष दिपेश फुलवाडे, उपशाखा अध्यक्ष भावेश ढोणे, उपशहर संघटक गणेश ढोनर, साई पांढिरकर, योगेश पाटील कार्यकर्ते उपस्थित होते. या कार्यकर्त्यांनी नागरिकांची विचारपूस करत नागरिकांना पाणी काढण्यास तसेच घरातील सामान सुरक्षित ठिकाणी ठेवण्यास मदत केली.

# मोहिली जलशुद्धीकरण केंद्रात पाणी

## खबरदारीसाठी पंपिंग स्टेशन तात्पुरते बंद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनदी पात्रातील पाणी मोहिली जलशुद्धीकरण केंद्रात आल्यामुळे खबरदारीची उपाय योजना म्हणून पहाटे ३.०० वा पंपिंग बंद करण्यात आलेले आहे. जलशुद्धीकरण केंद्रातील पाणी ओसरल्यानंतर पाणीपुरवठा सुरू करण्यात येईल. यामुळे संपूर्ण अ प्रभाक्षेत्र, ब प्रभाक्षेत्राचा काही भाग व जे प्रभाग क्षेत्रातील अशोक नगर, शिवाजीनगर वालधुनी या परिसराचा पाणीपुरवठा बंद राहील. तसेच काळू नदीवरील टिटवाळा जॅकवेलमध्ये पाणी आल्याने टिटवाळा जलशुद्धीकरण केंद्र सकाळी ८.३० वाजेपासून बंद करण्यात आलेले आहे. तथापि जलशुद्धीकरण केंद्रात कुठलाही बिघाड झालेला नाही. नागरिकांनी कृपया सहकार्य करावे.

# सद्भावना दिनी केडीएमसीतर्फे शपथ



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने आज सद्भावना दिनानिमित्त महापालिका मुख्यालयाच्या प्रांगणात सद्भावना दिवसाची शपथ घेण्यात आली . त्याचप्रमाणे आज राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त महापालिका मुख्यालयात महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी भारताचे माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यासमयी महापालिका सचिव किशोर शेळके, उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) संजय जाधव, कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, सहा.सुरक्षा अधिकारी सुरेश पवार तसेच इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

# राजभवन येथे सद्भावना प्रतिज्ञा

## दिवंगत प्रधानमंत्री राजीव गांधी यांना अभिवादन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : दिवंगत प्रधानमंत्री राजीव गांधी यांच्या 81 व्या जयंतीनिमित्त राजभवन येथे त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन करण्यात आले.

राज्यपालांचे उपसचिव तसेच परिवार प्रबंधक एस. राममूर्ती यांनी दिवंगत प्रधानमंत्री राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले. त्यानंतर सर्व उपस्थितांना सद्भावना प्रतिज्ञा देण्यात आली.

"जात, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषा विषयक भेद न करता सर्व भारतीय जनतेचे भावनिक ऐक्य आणि सामंजस्य यासाठी काम करण्याची, तसेच सर्व प्रकारचे मतभेद हिंसाचाराचा अवलंब न करता संविधानिक मार्गानी सोडवण्याची" प्रतिज्ञा यावेळी उपस्थितांनी घेतली. दिवंगत प्रधानमंत्री राजीव गांधी यांची जयंती सद्भावना दिवस म्हणून साजरी करण्यात येते.

# बस आगाराच्या प्रवेद्वारावर अडथळा ठरणाऱ्या वृक्षाचे स्थलांतर

## उल्हासनगर महानगरपालिकेत प्रथमच हा प्रयोग

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



उल्हासनगर : उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील उल्हासनगर-1 येथील अँटेलिया, बस आगाराच्या प्रवेद्वारावर 08 गुलमोहर व पामट्रीचे वृक्ष होते. बस आगारात प्रवेश करण्यासाठी सदरचे वृक्ष अडथळा ठरत असल्याने व आगारात प्रवेश करण्यासाठी दुसरा कोणताही मार्ग नसल्याने सदरचे वृक्ष काढणे आवश्यक होते.

उल्हासनगर महापालिकेच्या माननीय आयुक्त तथा प्रशासक श्रीम. मनिषा आव्हाळे (भा.प्र.से.) यांच्या आदेशाने, तसेच अतिरिक्त आयुक्त (2) श्री.डॉ.धीरज चव्हाण व उपआयुक्त (4) श्रीम. स्नेहा कर्पे यांच्या मार्गदर्शनाखाली व सहा. आयुक्त (1) तथा जनसंपर्क अधिकारी श्री. अजय साबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत "ऋषीकेश गार्डन" या कंपनीशी संपर्क करून सदरचे वृक्ष न तोडता दुसऱ्या जागेवर पुन्हा प्रत्यारोपण करणे प्रकरणी परिवहन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, उद्यान विभाग, अग्निशमन दल या सर्वांच्या प्रयत्नाने व सहकार्याने सदरचे मोठे वृक्ष JCP च्या सहाय्याने मुळासकट काढून ते बस आगारात पुन्हा लावण्यात आले. सदर वृक्षांना पुन्हा मुळ्या येण्यासाठी विशिष्ट प्रकारचे रसायन वापरले गेले. उल्हासनगर महानगरपालिकेत हा प्रयोग प्रथमच होत असून यामुळे 08 वृक्ष वाचविण्याचे प्रशंसनीय कार्य महापालिका प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

शासनाच्या 150 दिवसांच्या अभिनव उपक्रमात "वृक्ष प्रत्यारोपण" समाविष्ट करून पर्यावरण पुरक विकास साधणेचे महत्वपूर्ण कार्य उल्हासनगर महानगरपालिका प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

# फिट इंडिया सायकलिंग ड्राईव्ह विशेष उपक्रमात सहभाग नोंदवा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : भारत सरकारच्या क्रीडा विभागाच्या निर्देशानुसार राबविण्यात येणाऱ्या 'फिट इंडिया सायकलिंग ड्राईव्ह' विशेष उपक्रमांतर्गत 10 कि.मी. व 25 कि.मी. असे दि.24 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 06 वाजता साकेत मैदान येथून सुरू करण्यात येवून त्याच ठिकाणी ड्राईव्ह परत येवून पूर्ण करण्यात येणार आहे. ही ड्राईव्ह ठाणे पोलीस आयुक्तालय व ठाणे शहरातील नागरिकांच्या संयुक्त सहभागाने राबविण्यात येणार असल्याने या ड्राईव्हमध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या सायकलिंग ड्राईव्हचा मुख्य हेतु पोलीस दल व नागरिकांमध्ये 'फिटनेस की डोस, आधा घंटा रोज' व फिटनेसला आपल्या दैनंदिन जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनविणे हा आहे.

तरी ठाणे शहरातील महाविद्यालयातून जास्तीत जास्त संख्येने शिक्षक/विद्यार्थी यांनी स्वतःच्या सायकलसह सहभाग घेवून 'फिट इंडिया सायकलिंग ड्राईव्ह' या विशेष उपक्रमात सहभाग घेण्याचे आवाहन सहायक पोलीस आयुक्त सुरेखा कपिले यांनी केले आहे.

### जेएसडब्ल्यू कंपनीच्या विस्तारीकरणासाठी

# येणारा प्रकल्प आरोग्यास हानिकारक नाही

## - माजी सरपंच राजेश मोकल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



पेण : पेण तालुक्यातील जेएसडब्ल्यू कंपनीच्या फेज 3 च्या विस्तारीकरणासाठी 22 ऑगस्ट रोजी जनसुनावणी आयोजित करण्यात आली आहे. त्या जनसुनावणीला वडखळचे माजी सरपंच राजेश मोकल, डोलवीचे उद्योजक अनिल म्हात्रे, गडबचे उद्योजक तुलशिदास कोठेकर तसेच माजी सरपंच मनोहर कोळी ग्रामपंचायत माजी सदस्य धनाजी नाईक, महेश म्हात्रे, विजय गायकवाड यांच्यासह असंख्य नागरीकांचा जाहीर पाठिंबा असल्याचे त्यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत जाहिर केले.

तालुक्यातील वडखळ विभागात जेएसडब्ल्यू कंपनीच्या माध्यमातून आजपर्यंत हजारों युवकांना रोजगार मिळाला आहे. अनेक ठिकाणी कंपनीद्वारे विकासात्मक कामे होत आहेत. तसेच सर्वात मोठी असणारी वडखळ बाजारपेठ येथे कंपनीमुळेच मोठी उलाढाल होत असून यामुळे स्थानिकांना रोजगार मिळत आहे. अशा अनेक चांगल्या गोष्टी असतांनाही काहीजण विनाकारण विरोध दर्शवित आहेत. येणाऱ्या प्रकल्पाच्या विस्तारीकरणामुळे येथे अनेक आजार उद्भवणार आहेत. परंतु ते लोक विनाकारण नागरीकांची दिशाभूल करत आहेत. उलट या आगोदर अनेक वर्षे कंपनीत काढले. परंतु आजतागायत कोणताही प्रकारचा आरोग्यास धोका निर्माण झाला नाही. कंपनीने याकरीता येथे हॉस्पिटलची उभारणी केली आहे ती अधिक प्रभावी करावी यासाठी आम्ही कंपनीकडे मागणी करणार आहोत. उगाचच लोकांची दिशाभूल करु नये सदर कंपनीच्या माध्यमातून येणारा फेज 3 हा प्रकल्प या भागाच्या विकासासाठी अधिक महत्वाचा असून नागरीकांच्या आरोग्यास सुद्धा हानिकारक नाही. त्यामुळे 22 ऑगस्ट रोजी होणाऱ्या जनसुनावणीला आमचा जाहीर पाठिंबा असल्याचे माजी सरपंच राजेश मोकल यांच्यासह उपस्थितांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.




# कल्याण डोंबिवलीतील तीन नगरसेविकांचा शिवसेनेत प्रवेश

## शिवसेना मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश
## कल्याण ग्रामीणमध्ये उबाठा, राष्ट्रवादी काँग्रेसला खिंडार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : शिवसेनेचे मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेवत आज कल्याण डोंबिवली महापालिकेतील तीन नगरसेविकांनी आज शिवसेनेते प्रवेश केला. कल्याण ग्रामीणचे तालुका प्रमुख मुकेश पाटील, तालुका प्रमुख प्रकाश म्हात्रे, उबाठाच्या नगरसेविका प्रेमा म्हात्रे आणि नगरसेविका प्रमिला पाटील, संघर्ष समितीच्या नगरसेविका शैलजा भोईर, कोळेगावचे सरपंच राष्ट्रवादी काँग्रेसचे लालचंद भोईर, सरपंच सुनील भोईर, गुरुनाथ जाधव यांच्यासह शेकडो पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आज उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. ठाण्यात झालेल्या पक्ष प्रवेश सोहळ्यात आमदार राजेश मोरे, शिवसेना सचिव राम रेपाळे, कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की मागील अनेक वर्षांपासून शिवसेनेचे कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांशी कौटुंबिक नाते प्रत्येकजण जपत होता. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मतदार संघात हे पदाधिकारी काम करतात. आज वारकरी संप्रदायाचे देखील लोक आज शिवसेनेत सहभागी झाले असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. आज सखाराम पाटील, गजानन मांगरुळकर, संजय गायकर, धारीवलीचे उपसरपंच रमेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य समीर पाटील, गौरव ठाकूर, छाया काळे, वारकरी सांप्रदाय अध्यक्ष सुरेश ठाकरे, उपसरपंच चंद्रकांत ठाकूर, विश्वनाथ रसाळ, हेदुटणेचे सरपंच रामदास काळण, हरिश्चंद्र मांगरुळकर यांनी शिवसेनेचा भगवा झेंडा हाती घेतला.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत जनतेने आम्हाला पाठिंबा दिला. ८० जागा लढवून ६० जागा आम्ही जिंकलो. काहीजण म्हणत होते एकही जागा निवडून येणार नाही पण आमचे ६० आमदार निवडून आले. ब्रँडचा बँड वाजवण्याचे काम जनता करत असते, अशी टीका उपमुख्यमंत्री शिंदे यांनी उबाठावर केली. ते जेव्हा निवडणुका जिंकतात तेव्हा ईव्हीएम चांगला असतो आणि जेव्हा पराभव होते तेव्हा ईव्हीएम खराब, मात्र बेस्ट कर्मचारी पतपेढीची निवडणूक बॅलट पेपरवर झाली होती, असा टोला उपमुख्यमंत्री शिंदे यांनी उबाठाला लगावला.

मागील अडीच सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय घेतले. महायुतीच्या काळात स्थगिती सरकारचे सगळे स्पीडब्रेकर काढून टाकले. त्यामुळे जनतेने महायुतीच्या पारड्यात २३२ जागांचे ऐतिहासिक बहुमत दिले, असे ते म्हणाले. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुती प्रचंड मताधिक्याने जिंकेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला. अतिवृष्टीचे पंचनामे तातडीने करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत. मागील अडीच वर्षात शेतकऱ्यांना महायुती सरकारने ४५००० कोटींची मदत केली होती, आताही सरकार शेतकऱ्यांच्या पाठिशी असल्याचे त्यांनी सांगितले.

# मुसळधार पावसामुळे मुरबाड मधील जनजीवन विस्कळीत

## धाकलेश्वर शिवमंदिरात दोघेजण अडकले

दै.ठाणे जीवनदीप वार्ता





मुरबाड : गेले तीन दिवस मुंबईसह राज्यात पावसाने धुमाकूळ घातला असून मुरबाड शहरासह तालुक्याच्या ग्रामीण भागात मुसळधार पाऊस कोसळत असल्याने काळू, मुरबाडि, डोईफोडि,कनविरा , बारवि नद्या दुथडी भरून वाहू लागल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे.

कल्याण - अहिल्यानगर 61 मार्गावरील रायते ब्रिज पाण्याखाली गेल्याने खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाकडून महामार्ग काल रात्री पासून वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला आहे.तर मुरबाड शहरालगत देवगाव स्मशानभूमी जवळ असणार्या धाकलेश्वर शिवमंदिरात दोघेजण दोन अडकून पडल्याची माहिती मुरबाड तहसीलदारां कडुन प्राप्त झाली असून ते सुखरूप आहेत. पाण्याच्या प्रवाहाचि तिव्रता कमी होताच त्यांना रेस्क्यू केले जाणार असून सध्या त्यांना कोणताही धोका नाही.त्यांना नाष्टा व पाणी पोहचवले असल्याची माहीती तहसीलदार अभिजीत देशमुख यांनी दिली. तर घोरले गावात जाण्यासाठी असणारा पुलाची उंची कमी असल्या कारणाने दरवर्षी पाण्याखाली जातो यावर्षी हि घोरले गावातील नागरिकांचा संपर्क तुटला असून पुल वाहतुकीसाठी प्रशासनाकडून बंद ठेवला आहे.

दहिगाव -शेलारि येथिल काशिनाथ माळी यांच्या राहत्या घरावर झाड पडून त्यांच्या घराचे अंशतः नुकसान झाले तर उमरोलि खु.येथिल रघुनाथ लक्ष्मण सुरोशे यांच्या घराच्या पडविचा भाग कोसळला असून कुठलीही जीवित हानी झाली नाही. संबंधित नुकसानीचे पंचनामे केले असल्याचे महसुल विभागा कडून सांगण्यात येते.

> गेले दोन दिवस तालुक्यात मुसळधार पाऊस कोसळत आहे.तालुक्यात किरकोळ घटना वगळता मोठी कोणतिही दुर्घटना घडली नसून प्रशासकीय यंत्रणा सज्ज आहे. नागरिकांनी घाबरून न जाता काळजी घ्यावी व प्रशासनास माहिती द्यावी
> –अभिजीत देशमुख, तहसीलदार, मुरबाड

ठाणे • गुरुवार
•२१ ऑगस्ट २०२५
पान ४
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

# 'अभिजात मराठी माझ्या अपेक्षा' विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता / मुंबई : केंद्र शासनाच्या ३ ऑक्टोबर २०२४ च्या अधिसूचनेन्वये मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला. त्या अनुषंगाने राज्य शासनाने शासन निर्णय निर्गमित करून ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस तर ३ ते ९ ऑक्टोबर हा सप्ताह अभिजात मराठी भाषा सप्ताह म्हणून साजरा करण्याचे घोषित केले आहे.

अभिजात मराठी भाषा सप्ताह मध्ये मराठी भाषा विभागातर्फे मराठी भाषा दूत ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येणार आहे. ही स्पर्धा जगभरातील १८ ते २१ वयोगटातील मराठी बोलणाऱ्यांसाठी खुली असेल. "अभिजात मराठी-माझ्या अपेक्षा" या विषयावर जास्तीत जास्त तीन मिनिटांचा वेळ प्रत्येक स्पर्धकाला देण्यात येणार आहे. या स्पर्धेचे संयोजन ऑगस्ट मीडिया या संस्थेतर्फे केले जाईल. ही वक्तृत्व स्पर्धा ८ ते २२ सप्टेंबर २०२५ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येईल. महाराष्ट्रातील वेगवेगळे महसूल विभाग तसेच बृहन्महाराष्ट्र मिळून प्रथम नोंदणी करणाऱ्या १००० स्पर्धकांना प्रवेश मिळेल.

स्पर्धकांनी विषयाचे आकलन करून तो विषय आपल्या पद्धतीने मांडणे अपेक्षित आहे. यामधून जास्तीत जास्त १०० उत्तम स्पर्धकांची निवड "मराठी भाषा दूत" म्हणून करण्यात येईल. तसेच, सर्व सहभागींना महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागातर्फे सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. यासाठी गुगल फॉर्म पाठवण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट २०२५, रात्री १२ पर्यंत आहे.

या स्पर्धेसाठी १८ ते २१ या वयोगटातील जास्तीत जास्त युवकांनी ऑनलाईन स्पर्धेमध्ये https://forms.gle/NYvWxvYCSFXCjkzn9 या लिंकवर नोंदणी करावी, असे आवाहन मराठी भाषा विभागातर्फे करण्यात आले आहे.

# भुवन येथे नेत्र तपासणी शिबीर



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मानवी शरिराचा डोळा हा मुख्य अवयव आहे. दृष्टी नसेल तर माणसाचे जगणे हालाकीचे व जिकरीचे होऊन जाते. अंध व्यक्तींना या डोळयाचे महत्त्व काय आहे हे समजते. ठराविक वया नंतर माणसाची दृष्टी अधु होत जाते डोळयांना अनेक आजार होतात यामध्ये मोतिबिंदू येणे, कमी दिसणे व यासाठी सर्जरी करावे लागते.सर्व सामान्य माणसाला हा खर्च परवडणारा नसतो .

यासाठी भुवन येथे लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन श्रीगणेश कंस्ट्रक्शनचे प्रो.भास्कर पांडुरंग बांगर यांनी भुवन ,भुवनपाडा येथिल नागरिकांसाठी आयोजित केले होते.यामध्ये एकुण शंभरच्यावर नागरिकांची डोळयांची संपूर्ण तपासणी , तिरळेपणा,अचूक नंबर काढून देणे,काचबिंदू तपासणी,मोतीबिंदू तपासणी करण्यात आली असून ज्यांना डोळयांची सर्जरीची आवश्यकता आहे त्यांना पनवेल येथे नेऊन मोफत मोतिबिंदू ऑपरेशन केले जाणार असल्याची माहिती उपलब्ध डॉक्टरांनी दिली.

या शिबिराला खरेदी विक्री संघाचे संचालक सुरेश बांगर, भुवन ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. प्रमिला बांगर, भास्कर बांगर, दाजी बांगर, पत्रकार दिलीप पवार व गावातील अनेक जेष्ठ नागरिकांनी शिबिरास भेट दिली. तर हे शिबिर यशस्वी करण्यासाठी विश्वास बांगर व राहूल बांगर यांनी विशेष मेहनत घेतली.

# माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन

## तब्बल ३८ वर्षांनी जुने सवंगडी पुन्हा एकत्र



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ओतूर : गाडगे महाराज विद्यालय ओतूर येथील एस.एस.सी. बॅच १९८७ चे विद्यार्थी तब्बल ३८ वर्षांनी पुन्हा एकत्र आले. रविवार, दि. १७ ऑगस्ट रोजी मायभूमी ॲग्रो रिसॉर्ट, बनकर फाटा येथे हा गेट-टुगेदर उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमासाठी त्या काळातील मार्गदर्शक गुरुजन मोठ्या संख्येने उपस्थित होते. कातोरे, देशमुख, फापाळे, गवांदे, सहाणे, सातपुते, भागवत, घाडगे, कचाटे, घोलप, शिंदे, वाकचौरे, साबळे आदी गुरुजनांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. त्यानंतर दिवंगत गुरुजन व वर्गमित्रांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. वर्गमित्रांची ओळख परेड घेण्यात आली. गुरुजनांनी प्रत्येक विद्यार्थ्याचा गुलाबपुष्प व छडी देऊन गौरव केला. या वेळी सर्व गुरुजनांनी भावपूर्ण मनोगते व्यक्त केली.

दुपारच्या सत्रात स्नेहभोजनानंतर वर्गमित्रांनी गुरूबद्दल ऋण व्यक्त करणारी मनोगते मांडली. प्रगतीशील शेतकरी शरद फापाळे यांनी स्वतःच्या शेतातील लाल केळ्यांचा आस्वाद सर्वांना दिला. तसेच मनोरंजनपर कार्यक्रम रंगतदार ठरले.या गेट-टुगेदरच्या यशस्वी आयोजनासाठी अनिल बोडके, दिलीप डुंबरे, सुनील पानसरे, अरविंद पन्हाळे, रवींद्र डुंबरे, संजय फापाळे आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन रामदास डुंबरे व अनिल बोडके यांनी केले, तर आभारप्रदर्शन सुधाकर गिते व अरविंद जगताप यांनी मानले.

# खत विक्रीसाठी नवी एल-१ यंत्रणा अनिवार्य

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : खत विक्रेत्यांकडून खत विक्री करताना आता जुनी यंत्रणा न वापरता नवी एल-१ विक्री यंत्रणा वापरणे अनिवार्य करण्यात आले आहे. केंद्रीय खत विभागाच्या सूचनेनुसार भारतीय आधार प्राधिकरणाने मानांकन दिलेली ही नवी यंत्रणा खत वितरणासाठी अत्यावश्यक आहे.

जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार २० ऑगस्ट २०२५ पर्यंत सर्व खत विक्रेत्यांनी नवी एल-१ विक्री यंत्रणा घेऊन ती कार्यान्वित करणे बंधनकारक आहे. या मुदतीनंतर जुन्या यंत्रणेद्वारे खत विक्री बंद होणार असून सर्व खते केवळ एल-१ विक्री यंत्रणेद्वारेच वितरित केली जाणार आहेत.

ठाणे जिल्ह्यात एकूण १५३ नवीन एल-१ यंत्रे कार्यान्वित करण्यात आली असून, यासाठी आरसीएफ (RCF) कंपनी नेमण्यात आली आहे. कंपनीकडून ही यंत्रे खत विक्रेत्यांना विनामूल्य उपलब्ध करून दिली जाणार आहेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली या यंत्रणेच्या अंमलबजावणीस गती देण्यात आली आहे. या निर्णयामुळे खत वितरण प्रक्रियेत अधिक पारदर्शकता व शिस्तबद्धता येणार असून शेतकऱ्यांना वेळेवर खते मिळविणे सुलभ होईल.

खत विक्रेत्यांनी २० ऑगस्टपूर्वी नवी एल-१ यंत्रणा कार्यान्वित न केल्यास त्यांना दुकानातून खत विक्री करता येणार नाही, असा स्पष्ट इशारा कृषी विभागाने दिला आहे.

अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी, पंचायत समितीतील कृषी अधिकारी किंवा जिल्हा परिषद, ठाणे येथील कृषी विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी मुनीर बाचोटीकर यांनी केले आहे.

# जीएसटी भवनच्या पहिल्या टप्प्यातील इमारतीचे काम डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करावे

## - उपमुख्यमंत्री अजित पवार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : वडाळा येथे उभारण्यात येत असलेल्या जीएसटी भवनच्या चार पैकी पहिल्या इमारतीचे काम डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करावे. इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर या इमारतीमध्ये मुंबईमधील भाड्याच्या जागेमध्ये असलेली शासकीय कार्यालये स्थलांतरित करावीत, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.

मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयातील समिती कक्षामध्ये जीएसटी भवन येथे विविध शासकीय कार्यालयांना जागा वाटप करण्याविषयी बैठक झाली. त्यावेळी उपमुख्यमंत्री श्री. पवार बोलत होते. बैठकीस वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ.राजगोपाल देवरा, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, जीएसटी आयुक्त आशिष शर्मा यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जीएसटी भवनची इमारत कार्पोरेट धर्तीवर तयार करावी असे सांगून उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, या इमारतीमध्ये शासकीय कार्यालयांना जागा देताना नियमाप्रमाणे जागेचे वाटप करण्यात यावे. सध्या भाड्याच्या जागेमध्ये असलेल्या कार्यालयांच्या जागेची माहिती घेऊन जागा वाटप करावी. जागेचे वाटप झाल्यानंतर शिल्लक राहणारी जागा खासगी कंपन्यांना भाड्याने देण्याबाबत प्रस्ताव करावा. शासकीय कार्यालयांना जागा वाटपासाठी अपर मुख्य सचिव वित्त विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जीएसटी आयुक्त यांची संयुक्त समिती स्थापन करावी,अशा सूचनाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या. वडाळा येथील जीएसटी भवन या इमारतीमध्ये उपलब्ध असलेल्या हजार चौ. फूट जागेमध्ये शासनाची कार्यालये असणार आहेत. तसेच या ठिकाणी मेट्रो स्टेशन, उपनगरीय स्टेशन, पूर्व मुक्त मार्ग व अटल सेतू या रस्ते मार्गांची चांगली जोडणी असणार आहे.

# खर्डीतील समाजसेवक गणेश कोर यांचा समर्थकासह शिवसेनेत प्रवेश



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जिप व पंस च्या पार्श्वभूमीवर शहापूर तालुक्यात जिल्हाप्रमुख मारुती धिरडे व शिवसेना उपनेते,जिजाऊचे अध्यक्ष निलेश सांबरे यांच्या नेतृत्वाखाली रोज विविध राजकीय पक्ष संघटना व सामाजिक कार्यकर्ते प्रवेश करीत आहेत.खर्डी-अजनुप येथील सामाजिक कार्यकर्ते व व्यापारी गणेश कोर यांनी 15 ऑगस्ट रोजी शहापूर येथील वैश्यवाणी सभागृहात झालेल्या शिवसेनेच्या मेळाव्यात मारुती धिरडे व निलेश सांबरे यांच्या उपस्थितीत जाहीर केला. यावेळी शिरोळ जिप गटातील खर्डी, दळखण, धामणी,शिरोळ व अजनुप ग्राप मधील गणेश कोर यांच्या हजारो समर्थकांनी प्रवेश केला. गणेश कोर यांच्या प्रवेशामुळे शिंदे गट शिवसेनेची ताकद वाढली असून त्यांच्या उमेदवाराचा विजय निश्चित मानला जात आहे.यावेळी तालुकाप्रमुख प्रकाश वेखंडे,तालुका संपर्क प्रमुख आकाश सावंत,अशोक विर, कामिनी सावंत,सुरेंद्र तेलवणे,अरुण पानसरे व हरेश पष्टे आदी शिवसेनेचे व जिजाऊ संस्थेचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# भिवंडीत दोन दिवस मांसविक्री दुकाने बंद

## जैन महासंघाच्या मागणीमुळे पालिका प्रशासनाचे आवाहन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडीत दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील जैन धर्मियांचे पवित्र " पर्युषण पर्व " सुरू झाले आहे. त्या निमित्ताने श्री समस्त जैन महासंघाचे प्रमुख अशोक जैन यांनी यांनी भिवंडी महानगरपालिकेकडे केलेल्या मागणीनुसार बुधवार २० व २७ ऑगस्ट २५ असे सात दिवस शहरातील मांस विक्रीची दुकाने बंद ठेवण्याचे निर्देश महापालिका आयुक्त अनमोल सागर यांनी दिले आहेत.आदेशाला यास विरोध करणाऱ्यांवर पोलीस कारवाईसाठी महानगर पालिका आयुक्त प्रशासनाने विशेष पथक स्थापन केले केल्याची माहिती मालमत्ता बाजार व परवाना विभागाचे प्रभारी विभाग प्रमुख यांनी लेखी पत्राद्वारे दिला आहे.

भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात लहान व मोठी जनावरे कापण्यासाठी कत्तलखाने आणि मार्केट आहेत. तर मासळी विक्रीसाठी देखील या मार्केटमध्ये सोय केलेली आहे. तसेच शहरात विविध ठिकाणी व मोहल्ल्यात लहान मोठ्या जनावरांच्या मटणाची आणि कोंबड्यांचे मांस विक्रीची दुकाने आहेत. शहरातील अनेक अंतर्गत व मुख्य रस्त्यांवर हि मांस विक्रीची दुकाने उघड्यावर असल्याने नेहमी विक्रीसाठी टांगलेल्या मटणाचे ओंगळवाणे प्रदर्शन होत असते.सध्या पवित्र श्रावण महिना सुरु आहे.तसेच भिवंडी शहरात बुधवार २० व २७ ऑगस्ट २५ असे सात दिवस जैन धर्मियांचे "पर्युषण पर्व" साजरे होत आहे या निमित्ताने मंदिरात धार्मिक कार्यक्रम व पुजा आराधना जैन समाज बांधव करीत असतात.

या" पर्युषण पर्व " काळात मांस विक्रीची दुकाने बंद करण्यात यावीत अशी मागणी श्री.समस्त जैन महासंघाच्यावतीने शहरातील संयोजक अशोक जैन यांनी शासनाकडे केली होती. त्या मागणीनुसार महाराष्ट्र शासन परिपत्रकाची अंमलबजावणी आणि मा. मुंबई उच्च न्यायालयाने सुचविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या परवाना आणि मार्केट विभागातून शहरातील सर्व कत्तलखाने व मांस विक्री दुकाने बंद करण्याचे आदेश काढण्यात आले आहेत. या आदेशाचा भंग करणाऱ्यांवर पोलीस कारवाईसाठी भिवंडी महापालिका आयुक्त निर्देशानुसार पालिकेच्या मार्केट विभागातुन एकूण १९ जणांचे दोन पथक तयार केले आहे. हे पथक सकाळी ७ ते दुपारी ३ आणि दुपारी ३ ते रात्री ११ वाजेपर्यंत शहरातील मांस विक्रीच्या दुकानावर आणि कत्तलखान्यावर लक्ष ठेवणार आहे.

कामात कसुर केल्यास कारवाई केली जाईल असा इशारा आयुक्त सागर यांनी कर्मचाऱ्यांना दिला आहे. मात्र महापालिकेने तक्रारीसाठी कोणताही संपर्क कार्यालय अथवा फोन क्रमांक जाहीर केला नाही. त्यामुळे नाराजी व्यक्त केली जात आहे.

# पडघा ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी मयुरेश गंधे यांची बिनविरोध निवड



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या व चांगले उत्पन्न असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी मयुरेश गंधे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

मावळत्या उपसरपंच नयना जाधव यांनी आंपसात ठरल्याप्रमाणे राजीनामा दिल्याने हे पद रीक्त होते त्यानुसार सरपंच रविंद्र विशे यांच्या अध्यक्षतेखाली एक खास सभा ग्रामपंचायत कार्यालयातील सभागृहात बुधवारी घेण्यात आली. यावेळी उपसरपंच पदासाठी मयुरेश अनिल गंधे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची उपसरपंच पदावर निवड झाल्याचे घोषित करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य शैलेश बिडवी, अभिषेक नागावेकर, नसीर शेख, नयना जाधव, सायली पाटील, वृषाली खिसमतराव, चंदा साळुंके, रश्मी तेलवणे, निता दास उपस्थित होते तर यावेळी सचीव म्हणुन ग्रामपंचायत अधीकारी भास्कर घुडे यांनी काम पाहिले. गंधे यांची निवड होताच डॉ. संजय पाटील, अशोक शेरेकर, शशांक तांबोळी, दिनेश गंधे, राजेश साळुंखे, गुरूनाथ मोरे, अविनाश दास, रुपेश तेलवणे,सुनील गंधे, संतोष तेलवणे, ग्रामपंचायत कर्मचारी यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# मुसळधार पावसाचा खरोशी गावाला फटका

## घरांमध्ये पुराचे पाणी शिरले



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : सतत दोन-तीन दिवस पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे पेण तालुक्याला मोठा फटका बसला आहे. बाळगंगा नदीने धोक्याची पातळी ओलांडली असल्याने अनेक गावांचा संपर्क तुटल्याची माहिती मिळाली आहे. बाळगंगा नदीला आलेल्या पुरामुळे खरोशी गावात पुराचे पाणी शिरले आहे. या परिस्थितीमुळे गावातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. स्थानिक प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे. पावसामुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीमुळे नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. जनजीवन विस्कळीत झाले असून संपर्क तुटल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली.सकाळी सकाळी बाळगंगा नदीच्या पाणी पातळीत वाढ झाल्याने अचानक नदीचे पाणी वाढल्यामुळे नदी किनारी असणाऱ्या घरांमध्ये पाणी घुसायला लागले आणि एकच तारांबळ उडाली. घरातील अस्ताव्यस्त पडलेला सामान इतरत्र हलवण्यात दमछाक झाली अनेक गावकऱ्यांनी येऊन आसपासच्या घरांना मदतीचा हात दिला आणि त्यांना घरातून बाहेर काढले. घरातील सामानाचे नुकसान झाले आहे. सतर्कतेचा इशारा देण्यात आला असला तरी प्रशासन पूरग्रस्त भागावर लक्ष ठेवून आहे. पीडितांना आवश्यक ती मदत देण्यात येणार अशी माहिती प्रशासनाने दिली.

याबाबत पेण तहसीलदार तानाजी शेजाळ यांनी सांगितले की बाळगंगा नदीला आलेल्या पुरामुळे आम्ही सर्व गावाला सतर्कतेचा इशारा दिला असून ग्रामस्थांना स्थलांतर करण्याचा स्थानिक प्रशासनाला सूचना दिले आहेत असून पुराचे पाणी वाढले तर तात्काळ आमची टीम तयार असून वेळच्या वेळी मदत कार्य केले जाईल असे सांगितले.

प्रति गाणगापूर
प.पू.स.रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर (तानसा), ता. शहापूर, जि.ठाणे



मन, वाचा व शरीराने कोणालाही त्रास न देणे, हा सुद्धा एक यज्ञच होय. जो विनाकारण हृदय जाळतो तो आत्मघातकी होय. सदासर्वदा प्रसन्न राहणे हा सुद्धा यज्ञच होय. यज्ञाशिवाय, सत्कर्म घडल्या शिवाय चित्तशुद्धी होत नसते आणि चित्तशुद्धीशिवाय ज्ञान टिकत नसते. सत्कर्मांनी सर्वच इंद्रिये शुद्ध होऊन त्याला परमात्म्याचा साक्षात्कार होतो. म्हणून सदैव सत्कर्म करत रहा

गुरुमाऊली - प.पू.स.अलोकनाथजी महाराज
मो.नं.7038727403/9890226862

# नगरसेविका मानसी देसले यांच्या उपाययोजनांमुळे विद्यानगर रहिवाशांची पुरातुन मुक्तता



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड नगरपंचायत क्षेत्रातील प्रभाग क्रं. 2 मध्ये येत असलेल्या विद्यानगर परिसर गेले अनेक वर्ष पुराच्या पाण्यात वेढला जायचा .यामुळे येथील नागरिकांच्या घरात पाणी शिरून घरातील किंमती फर्निचर व महागड्या वस्तू खराब होऊन मोठे आर्थिक नुकसान होत असे, शिवाय घरात पाणी घुसल्याने पाणी ओसरे पर्यंत कुटुंबाना प्रसंगी घर सोडून बाहेर सुद्धा राहावे लागत होते.

परंतु विद्यानगर मध्ये मागिल वर्षापासून महत्वाची पुराची समस्या दुर झाली आहे त्याला एकमेव कारण म्हणजे या प्रभागाचे नेतृत्व करणारी नगरसेविका सौ. मानसी मनोज देसले व त्यांचे पती जनसेवक मनोज रमेश देसले यांनी केलेल्या प्रभावी उपाय योजनामुळे तसा विद्यानगर हा भाग कल्याण -नगर राष्ट्रीय महामार्ग 61 ला लागून आहे, परंतु विकासकांनी केलेल्या चुकीच्या बांधकामामुळे या भागात वरून येणार्या पुराच्या पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने होत नसल्याने या ठिकाणी पाणी तुंबून पूर परिस्थिती निर्माण होत असे. नागरिकांना दिलेला शब्द पाळणे हे देसले दांम्पत्याचे इती कर्तव्य असल्याने स्थानिक आमदार किसन कथोरे यांच्या सहकार्याने व मुरबाड नगरपंचायतच्या माध्यमातून गटारे व इतर व्यवस्थेमुळे पुराचे पाणी साठून न राहता निघून जात असल्याने आता या विभागातील पुराचा धोका कायमस्वरूपी मिटला असल्याचे येथील रहिवाशांनी सांगितले असून त्यांनी केलेल्या कामाबाबत समाधान व्यक्त करून देसले दांम्पत्याचे मनपूर्वक आभार देखील मानले आहेत.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) — कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) — कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) — कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024